

मोरजी पंडिरवाडा येथे मिनी पुलाच्या जोड रस्त्याला डांबरीकरण करण्याची मागणी पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



भारताच्या बांगलादेश दौऱ्याचे वेळापत्रक जाहीर पान ४ वर

वेर्णा, बुधवार, १६ एप्रिल २०२५ । पाने ४ । ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 223 | Verna, | facebook.com/dainikherald | Wednesday 16 April 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### सोनिया गांधीचे आरोपपत्रात नाव

**नवी दिल्ली, दि. १५ :** काँग्रेसच्या नॅशनल हेराल्ड वृत्तपत्र आणि असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) मंगळवारी पहिले आरोपपत्र दाखल केले. यामध्ये सोनिया गांधी, राहुल गांधी, सॅम पित्रोदा आणि सुमन दुबे यांची नावे आहेत. या प्रकरणाची सुनावणी २५ एप्रिल रोजी दिल्लीतील राऊस अव्हेन्यू कोर्टात होईल. न्यायालयाने ईडीकडून या प्रकरणाची केस डायरीही मागितली आहे. या प्रकरणातील तक्रार भाजप नेते सुब्रमण्यम स्वामी यांनी सोनिया, राहुल आणि त्यांच्या सहयोगी कंपन्यांशी संबंधित लोकांविरुद्ध दाखल केली होती. ईडीच्या आरोपपत्रावर काँग्रेस मीडिया सेलचे प्रमुख जयराम रमेश म्हणाले की, नॅशनल हेराल्डची मालमत्ता जप्त करणे हा कायद्याच्या नावाखाली राज्य पुरस्कृत गुन्हा आहे. हे पंतप्रधान मोदींच्या सूडाचे राजकारण आणि धमक्यांशिवाय दुसरे काही नाही. या प्रकरणात, १२ एप्रिल रोजी तपासादरम्यान, जप्त केलेल्या मालमत्ता जप्त करण्याची कारवाई करण्यात आली. ईडीने ६६१ कोटी रुपयांच्या स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्यासाठी नोटीस बजावली होती.

-------------

### अमरनाथ यात्रेसाठी नोंदणी सुरू

**श्रीनगर, दि. १५ :** देशभरातील भाविक आणि यात्रेकरूंचे श्रद्धास्थान असलेली अमरनाथ यात्रा ३ जुलैपासून सुरू होत आहे. यासाठी नावनोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यावर्षी अमरनाथ यात्रा ३ जुलैपासून सुरू होईल आणि ९ ऑगस्ट (रक्षाबंधन) पर्यंत (३९ दिवस) चालेल. हा प्रवास दोन मार्गांनी होईल – पहलगाम (अनंतनाग) आणि बालटाल (गंदरबल) मार्गांनी. यात्रेत सुमारे ६ लाख भाविक येऊ शकतात. ५ मार्च रोजी श्री अमरनाथ श्राइन बोर्डाच्या (एसएएसबी) ४८ व्या बैठकीत उपराज्यपाल मनोज सिन्हा यांनी यात्रेच्या तारखा जाहीर केल्या. भाविकांसाठी सुविधा सुधारण्यासाठी अनेक प्रस्तावांवर बैठकीत चर्चा करण्यात आली. तीर्थयात्रा अधिक सुव्यवस्थित आणि सुरक्षित व्हावी यासाठी श्राइन बोर्डाने ई-केवायसी, आरएफआयडी कार्ड, ऑन-स्पॉट नोंदणी आणि इतर व्यवस्थांमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही भाविकांसाठी विशेष सुविधांची व्यवस्था करण्यात आली आहे.

----------

### राम मंदिरावर बॉम्ब हल्ल्याची धमकी

**अयोध्या, दि. १५ :** अयोध्येतील राम मंदिरावर बॉम्ब हल्ला करण्याची धमकी देण्यात आली आहे. सोमवार रात्री राम जन्मभूमी ट्रस्टकडून एक ई-मेल आला. त्यात लिहिले आहे- मंदिराची सुरक्षा वाढवा. ट्रस्टचे अकाउंट ऑफिसर महेश कुमार यांनी मंगळवारी सायबर सेलमध्ये या संदर्भात तक्रार दाखल केली आहे. धमकी मिळाल्यानंतर, जन्मस्थान संकुल आणि आसपासच्या परिसरात सुरक्षा दलांची गस्त वाढवण्यात आली आहे. इलेक्ट्रॉनिक देखरेख प्रणाली अधिक सक्रिय करण्यात आली आहे. पोलिसांनी मंदिराजवळ शोध मोहीम राबवली. त्याचवेळी, बाराबंकी, चंदौली आणि अलीगढसह अनेक जिल्ह्यांच्या जिल्हा दंडाधिकाऱ्यांनाही धमकीचे ई-मेल आले आहेत. यामध्ये डीएम कार्यालयावर बॉम्ब हल्ला करण्याची धमकी देण्यात आली आहे. हे सर्व मेल तामिळनाडूहून पाठवण्यात आले आहेत.

### हवामान

कमाल : ३४ किमान : २५

आर्द्रता : ७१

### बाजार भाव

सोने : ₹ ९६,७८० (१० ग्रॅम)

चांदी : ₹ ९९,१०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७४,३६५ .७७↑ (२३१.१६ )

निफ्टी : २३,२३५.९० ↑ (८३.९५)

# मुरगावात ४३.२० कोटींचे कोकेन जप्त

## गोव्यातील आतापर्यंतची सर्वांत मोठी कारवाई | दांम्पत्यासह एकास अटक

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. १५ : चिकोळणा- मुरगाव येथे क्राईम ब्रांचने सोमवारी रात्री बसस्थानक परिसरात छापा टाकून तब्बल ४३ कोटी २० लाखांचे ४ किलो ३२.५ ग्रॅम कोकेन जप्त केले. याप्रकरणी निबू व्हिन्सेंट (४५, रा. बायणा) याच्यासह मंगेश आणि रेश्मा वाडेकर (रा. सडा- वास्को) या पती - पत्नीला अटक केली आहे. ही गोवा पोलिसांची ड्रग्ज विरोधातील आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई असल्याचे क्राईम ब्रांच पोलिस अधीक्षक राहुल गुप्ता यांनी सांगितले आहे. मंगळवारी पणजीत झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. दरम्यान, सर्व संशयितांना वास्को येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात हजर केले असता त्यांना न्यायाधीशांना पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.**

पोलिस अधीक्षक गुप्ता यांनी दिलेल्या माहितीनुसार, क्राईम ब्रांचला चिकोळणा येथे काही व्यक्ती ड्रग्ज वितरित करणार असल्याची



माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिस निरीक्षक लक्ष्मी आमोणकर, प्रशल देसाई यांच्यासह पोलिस कॉन्स्टेबल सैमुल्ला मकानदार, नवीन पालयेकर, सुजय नाईक, राहुल नाईक, रोशनी शिरोडकर, गृहरक्षक निगम खोत यांनी सोमवारी रात्री चिकोळणा बसस्थानक परिसरात तपासणी केली. यावेळी संशयिताच्या बॅगेत चॉकलेट आणि कॉफीच्या पाकिटात लपवलेला कोकेन सदृश पदार्थ सापडला. जप्त केलेला कोकेन रेश्मा हिला गोव्याबाहेरून आणून देण्यात आले होते, असे प्रथमदर्शनी तपासात आढळून आले आहे.

सापडलेल्या पदार्थाची चाचणी केल्यावर तो कोकेन असल्याचे स्पष्ट झाले. पोलीस चौकशीत संशयिताने मंगेश आणि रेश्मा वाडेकर हे आपले साथीदार असल्याचे सांगितले. पोलिसांनी तांत्रिक सर्वेक्षण करून या पती-पत्नीला मंगळवारी दुपारी अटक केली. यापूर्वी या दोघांवरही अन्य गुन्हे दाखल झाले होते. व्हिन्सेंट काही दिवसांपूर्वी थायलंड येथे जाऊन आला होता. कोकेन कुठून आले आणि ते कुणाला देण्यात येणार होते, याविषयी तपास सुरू आहे. व्हिन्सेंट आणि मंगेश हे ग्राहकांच्या मागणीनुसार ड्रग्जची विक्री करत होते. तिघाही संशयितांच्या घराची झडती घेतली जाणार असल्याची माहिती अधीक्षक गुप्ता यांनी दिली.

### ठळक मुद्दे

- २०२४ मध्ये १० कोटींचे अंमली पदार्थ जप्त.
- २०२५मध्ये आत्तापर्यंत ५५ कोटींचे अंमली पदार्थ जप्त.
- चॉकलेट आणि कॉफीच्या ३२ पाकिटात लपवलेला कोकेन ताब्यात
- क्राईम ब्रांचची बसस्थानक परिसरात कारवाई

### मुख्यमंत्र्यांकडून अभिनंदन

राज्यातील आतापर्यंतची सर्वांत मोठी अमलीपदार्थविरोधी कारवाई आहे. गोवा पोलिसांच्या कारवाईचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी अभिनंदन केले आहे. ही कारवाई सरकारची अंमली पदार्थांच्या विरुद्धच्या सुरू असलेल्या लढाईतील वचनबद्धता आहे, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

### रेश्मा मुख्य सूत्रधार ?

रेश्मा वाडेकर ही मुख्यसूत्रधार असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. ती परदेशात अधूनमधून जात होती आणि अलीकडेच ती विदेशातूनच परतली होती. त्यामुळे या प्रकरणामागे आंतरराष्ट्रीय रॅकेट असल्याची शक्यता वर्तविली जात आहे. यापूर्वी रेश्मा हिला वेश्या व्यवसायप्रकरणी पोलिसांनी अटक केली होती. ती काही महिने कोलवाळ तुरूंगात होती.

### वेफर्स, चॉकलेटमध्ये लपवले होते कोकेन

संशयित रेश्मा हिने हे कोकेन गोव्यात कसे आणले की तिला कोणी आणून दिले, याचा तपास गुन्हे अन्वेषण विभागकडून करण्यात येत आहे. संशयितांनी कोकेन चॉकलेट, वेफर्स तसेच कॉफी पॅकेटमध्ये लपवून ठेवल्याचे तपासात समोर आले आहे.



# सिद्दिकी पलायन प्रकरण 'सीबीआय'कडे देण्यास नकार

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १५ :** जमीन हडप प्रकरणातील अट्टल गुन्हेगार सिद्दिकी सुलेमान खान पलायन प्रकरण केंद्रीय गुप्तचर विभागाकडे (सीबीआय) देण्यास मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने नकार दिला आहे. सुलेमानच्या याचिकेवर मंगळवारी सुनावणी होऊन सदर याचिका न्यायालयाने फेटाळून लावली. याबाबतचा आदेश न्या. भारती डांगरे आणि निवेदिता मेहता या द्विसदस्यीय न्यायपीठाने दिला आहे.

जमीन बळकाव प्रकरणात अटकेत असताना संशयित सिद्दिकी गुन्हा शाखेच्या कोठडीतून पसार झाला होता. त्यानंतर सुलेमानने आपण पसार झाला नव्हता तर आपल्याला पोलिसांनी पळण्यास सांगितले होते,

### ▶ गोवा खंडपीठाने सुलेमान खानची याचिका फेटाळली

असा दावा करीत या प्रकरणाची सीबीआय चौकशी करावी, अशी मागणी करीत सुलेमानने मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठात याचिका दाखल केली होती. ही याचिका आज फेटाळून लावली आहे.

संशयित सिद्दिकी खानला गुन्हा शाखेच्या विशेषतपास पथकाने (एसआयटी) त्याला १२ नोव्हेंबर २०२४ रोजी हुबळीमधून अटक केली होती. सिद्दिकीने १३ डिसेंबर २०२४ रोजी पहाटे आयआरबीचा कॉन्स्टेबल अमित नाईक याची मदत घेऊन गुन्हा शाखेच्या कोठडीतून पलायन केले होते. त्यानंतर पुन्हा गुन्हा शाखेच्या पथकाने एर्नाकुलम (केरळ) पोलिसांच्या मदतीने सिद्दिकीला २१ रोजी अटक केली होती.

# यंदा पाऊस जोरदार बरसणार

**नवी दिल्ली, दि. १५ :** संपूर्ण देशाचे आणि प्रामुख्याने शेतकऱ्यांचे लक्ष लागून राहिलेल्या मोसमी पावसाची आनंद वार्ता भारतीय हवामान विभागाने दिली आहे. प्रशांत महासागरातील एल निनो स्थिती तटस्थ आहे. संपूर्ण मोसमी पावसाच्या काळात एल निनो सक्रीय होण्याची स्थिती नाही. हिंदी महासागरीय द्विध्रुविताही तटस्थ आहे. डिसेंबर – मार्च या काळात युरोशिया आणि हिमालयात बर्फाच्छादित भाग सरासरीपेक्षा कमी राहिला त्यामुळे यंदा सरासरीपेक्षा जास्त १०५ टक्के पाऊस पडण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तविला आहे.

आयएमडी प्रमुख मृत्युंजय महापात्रा म्हणाले की, २०२५ मध्ये १०५% म्हणजेच ८७ सेमी पाऊस पडू शकतो. ४ महिन्यांच्या मान्सून हंगामासाठी दीर्घ कालावधीची सरासरी ८६८.६ मिमी म्हणजेच ८६.८६ सेमी आहे. म्हणजेच पावसाळ्यात एकूण एवढा पाऊस पडायला हवा. १ जूनच्या सुमारास मान्सून केरळमार्गे येतो. ४ महिने पाऊस पडल्यानंतर, म्हणजे सप्टेंबरच्या शेवटी, मान्सून राजस्थानमार्गे परत येतो. ते १५ ते २५ जून दरम्यान अनेक राज्यांमध्ये पोहोचते.

आयएमडी प्रमुख मृत्युंजय महापात्रा म्हणाले की, यावर्षी अल निनोची परिस्थिती निर्माण होणार नाही. सध्या देशाच्या अनेक भागात तीव्र उष्णता आहे. एप्रिल आणि जूनमध्ये उष्णतेच्या लाटेच्या दिवसांची संख्या वाढेल.

# 'लाला की बस्ती'वर अखेर बुलडोझर

## न्यायालयाच्या आदेशानुसार कारवाई | २३ अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. १५ :** थिवी येथील कोमुनिदाद जमिनीतील बेकायदेशीररित्या बांधलेल्या औचितवाडा येथील बहुचर्चित 'लाला की बस्ती' झोपडपट्टीमधील २३ अनधिकृत बांधकामे तथा घरे अखेर मंगळवारी जमीनदोस्त करण्यात आली. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली.

मंगळवारी सकाळी ९.३० वाजता उत्तर गोवा कोमुनिदाद प्रशासक कार्यालयाने उच्च न्यायालयाच्या आदेशाची कार्यवाही अतिक्रमण हटाव पथकाच्या सहाय्याने सुरु केली. यावेळी २०० हुन अधिक पोलिसांचा कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यावेळी बार्देशचे दंडाधिकारी मालमेदार अनंत मळीक, संयुक्त मामलेदार साईश नाईक, अव्वल कारकून शैलेश कोठावळे तसेच कोमुनिदाद ॲटर्नी सावियो परेरा उपस्थित होते. अतिक्रमण हटाव पथकाने जवळपास २३ घरे जेसीबीच्या सहाय्याने जमीनदोस्त केली.



कोमुनिदाद जागेत अवैधरित्या उभारण्यात आलेल्या २३ घरांना फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात उत्तर गोवा कोमुनिदाद प्रशासक पांडुरंग गाड यांनी नोटिसा बजावून घरे पाडण्याचे निर्देश दिले होते. शिवाय स्वतःहून बांधकाम पाडून जागा पूर्वपदी आणण्यासाठी १५ दिवसांचा अवधी दिला होता. शिवाय दिलेल्या मुदतीत घरे हटवली गेली नाही, तर ती पाडली जातील, असा इशारा प्रशासकांनी आदेशात दिला होता. ही मुदत ११ मार्च रोजी संपली होती. मात्र नंतर ऐनवेळी ही कारवाई थांबवण्यात आली होती.

घरांवर कारवाई होणार याची कल्पना लागल्यानंतर सोमवारी रात्री ती घरे संबंधितांकडून खाली करण्यात आली. त्यानंतर त्यांना पुरविण्यात आलेला पाणी तसेच विजेचा पुरवठाही खंडित करण्यात आला. कारवाईवेळी संबंधित घरामालकांकडून विरोध होण्याची दाट शक्यता होती. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पोलिस फौजफाटा तैनात करण्यात आला होती. मात्र, तसे काहीच झाले नाही. कोणताही याठिकाणी विरोध झाला नाही. यंत्रणेला आपले काम व्यवस्थितरित्या पार पाडता आले.

कोमुनिदादच्या जागेवरील हे बेकायदा अतिक्रमण थांबवण्यासाठी थिवी कोमुनिदाद व्यवस्थापन समितीने २००८ मध्ये न्यायालयात धाव घेतली होती. कनिष्ठ न्यायालयाने ही बांधकामे हटवण्याचा आदेश दिला होता. या आदेशाला संबंधितांना उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. मात्र गेल्या २०२३ मध्ये ही याचिका फेटाळून कनिष्ठ न्यायालयाच्या आदेशाची कार्यवाही करण्याचे निर्देश उत्तर गोवा कोमुनिदाद प्रशासकांना दिले होते.

# कला अकादमीच्या नशिबाचे धिंडवडे सुरूच !

## तांत्रिक बिघाडानंतर मंत्री झाले सक्रिय | सरकार ढीम्म

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १५ :** कला अकादमीच्या दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहाच्या रंगमंचावर तांत्रिक बिघाडामुळे नाट्यप्रयोगात व्यत्यय आल्यानंतर तब्बल दोन दिवसांनी कला आणि संस्कृती मंत्री गोविंद गावडे यांनी या घटनेची दखल घेतली आहे. सदर घटनेचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश कला अकादमीच्या सदस्य सचिवांना गावडे यांनी दिले असले तरी या घोटाळ्याला सार्वजनिक बांधकाम खाते जबाबदार असल्याचे म्हटले आहे.

माध्यमांशी बोलताना मंत्री गावडे म्हणाले की, नाट्यप्रयोग तांत्रिक बिघाडामुळे थांबवावा लागला. मी सदस्य सचिवांना अहवाल सादर करण्यास सांगितले असून, या बिघाडामागील कारणे नमूद करण्याचे निर्देश दिले आहेत. दोन दिवसांत अहवाल मिळण्याची अपेक्षा आहे. गावडे यांनी याआधी मराठी नाट्य व तियात्र' स्पर्धा कोणत्याही अडथळ्यांशिवाय पार पडल्याचे सांगून, सद्यस्थितीतील बिघाड केवळ तांत्रिक स्वरूपाचा असल्याचे स्पष्ट केले. त्यांनी हेही नमूद केले की, कला अकादमी ही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत येते आणि त्यातील बांधकाम कामांसाठी विभागच जबाबदार आहे.

'कला राखोण मांड' या सांस्कृतिक संघटनेचे संयोजक आणि कार्यदल सदस्य देविदास आमोणकर यांनी सांगितले की, मी टास्क फोर्सची बैठक घेण्याची विनंती केली आहे. ती या महिन्याच्या अखेरीस होण्याची शक्यता आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष देखील याबाबत आग्रही आहेत. गेल्या बैठकीत मुख्यमंत्र्यांना कार्यदलाच्या शिफारसी सादर करण्याची सूचना करण्यात आली होती. मात्र, अद्याप त्या बैठकीचे इतिवृत्तच आम्हाला मिळालेले नाही. आमोणकर यांनी असेही अधोरेखित केले की, सभागृहातील खोटे छत कोसळून दोन वर्षे होऊनही आजतागायत कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

कार्यदलातील एका सदस्याने नाव जाहीर न करण्याच्या अटीवर सांगितले की, कला व संस्कृती मंत्री जबाबदारी झटकण्यासाठी वेळोवेळी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे बोट दाखवतात. जे घडले आहे ते संपूर्ण महाराष्ट्रातच नव्हे तर देशभरात पोहोचले आहे. दुर्दैवाने, कला अकादमी राजकारणाचे बळी ठरत आहे.



ही घटना कला अकादमीत प्रथमच घडलेली नसून, १७ जुलै २०२३ रोजी ओपन एअर ऑडिटोरियमच्या छताचा एक भाग कोसळल्याची घटना घडली होती. यामुळे अकादमीच्या पुनर्बांधणी कामाच्या दर्जावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले.

या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने ज्येष्ठ नाट्यकलावंत विजय केंकरे यांच्या अध्यक्षतेखाली १३ सदस्यीय कार्यदल स्थापन केले. या समितीने अकादमीतील पायाभूत सुविधांची पाहणी करून सुधारणा आणि उन्नतीसाठी शिफारसी कराव्या, असे उद्दिष्ट ठरवण्यात आले होते. २२ ऑक्टोबर रोजी एंटरटेनमेंट सोसायटी ऑफ गोवा येथे झालेल्या पहिल्या बैठकीत कार्यदलाने कला अकादमीच्या पाहणी दरम्यानच्या निरीक्षणांवर चर्चा केली. अध्यक्ष विजय केंकरे यांनी नूतनीकरणाच्या कामावर नाराजी व्यक्त करत ते समाधानकारक नसल्याचे सांगितले. ध्वनीप्रणाली, एसी गळती, ध्वनिशास्त्रीय त्रुटी आदी समस्यांकडे त्यांनी लक्ष वेधले.

कार्यदलातील महत्त्वाचा घटक असलेल्या चार्ल्स कोरिया फाउंडेशनने प्रक्रियेतील त्रुटींमुळे सहभागी होण्यास नकार दिला. त्यांनी सखोल स्ट्रक्चरल ऑडिटची गरज व्यक्त केली. तसेच, हे ऑडिट ' आयआयटी मद्रास' यांनी केल्यासच फाउंडेशन त्यात सल्लागार सेवा देईल, अशी अट ठेवली.

गेल्या वर्षी जुलैमध्ये झालेल्या मुसळधार पावसात कला अकादमीच्या इमारतीत पाणी शिरल्याची घटना समोर आली होती. नियंत्रण कक्षातील ध्वनीरोधक फरशीसह इतर भागात पाणी साचले होते. पावसाळ्यात कोणतीही प्रतिबंधात्मक उपाययोजना न केल्याचे यानिमित्ताने उघड झाले.

अकादमी संकुलातील काही झाडेही उन्मळल्याची माहिती समोर आली होती. यावर प्रतिक्रिया देताना मंत्री गावडे यांनी गळती न झाल्याचा दावा केला. कला अकादमी तीन वर्षे दुरुस्तीसाठी बंद होती व नोव्हेंबर २०२३ मध्येच पुन्हा सुरू करण्यात आली.